औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दिनांक ३०.११.१९९१ [...]
रोजी झालेल्या ६८ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. अरविंद महाजन | उपसभापती |
| २] श्री. त्र्यंबकराव देशपांडे उर्फ बबरू घारठाणकर | सदस्य |
| ३] श्री. दे. हि. मून उपसंचालक नगररचना औरंगाबाद. | सदस्य |
| ४] श्री. राजभोज, कार्यकारी अभियंता महानगरपालिका औरंगाबाद [आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांचे सदस्य प्रतिनिधी] | सदस्य प्रतिनिधी |

मा. श्री. ईश्वरराव भोसीकर सभापती, औरंगाबाद मंडळ हे सभेस हजर नसल्यामुळे आजच्या सभेच्या अध्यक्षपदासाठी श्री. महाजन उपसभापती यांचे नांव श्री. मुन, उपसंचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग, औरंगाबाद यांनी सुचविले, श्री. त्र्यंबकराव देशपांडे, सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी त्यास अनुमोदन दिले. श्री. महाजन, उपसभापती यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारल्यानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

विषय क्र. १: दिनांक ९.१०.९१ रोजी झालेल्या ६७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ४०७

मंडळाच्या ६७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविण्यांत आला व सविस्तर चर्चा होऊन दिनांक ९.१०.९१ रोजी झालेल्या ६७ व्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: मंडळाच्या वसाहतीमधील सुविधासाठी आरक्षीत असलेल्या भूखंडाचा उपयोग बदलणेबाबत.

ठराव क्र. ४०८

मंडळाने वरील विषयावर सविस्तर चर्चा करून सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे निर्णय घेतला.

ठराव क्र. ४०८ अन्वये घेतलेले निर्णय खालील प्रमाणे

| अ.क्र. | वसाहतीचे नांव | आरक्षीत सुविधा | क्षेत्रफळ चौ.मी. | मंडळाने घेतलेला निर्णय[भूखंडाच्या वापरासंबंधी ] |
|---|---|---|---|---|
| १. | एकनाथनगर औ,बाद | पोष्ट ऑफिस | १८२.०० | सदर भूखंडावर अतिक्रमण होऊ नये म्हणून त्या भूखंडावर दुकाने बांधून एक हॉल ठेवावा. हा हॉल आवश्यकतेनुसार पोष्ट ऑफिसकरिता देता येईल. |
| | | प्राथमिक शाळा | ११२७.०० | औरंगाबाद महानगरपालिकेस पैसे भरण्याची अंतिम संधी यावी व १५ दिवसात पैसे भरले नाहीत. तर शासन मान्य खाजगी शिक्षण संस्थांकडून जाहिरात देऊन निविदा बोलविण्यात येतील असे त्यांना कळवावे. पैसे न भरल्यास वरील प्रमाणे कार्यवाही करावी. |
| २. | सहयोगनगर | पोष्ट ऑफिस | ३२०.०० | शॉपींग सेंटरसाठी जागेचा वापर करावा. |
| | | बालवाडी | २९३.०० | शासन मान्य खाजगी शिक्षण संस्थेकडून जाहिरात देऊन निविदा बोलावून जागेचे वाटप करावे. |
| ३. | सातपूर नाशिक | दवाखाना | १८८०.०० | सदर भूखंडासाठी चॅरिटेबल ट्रस्टच्या कायद्यानुसार नोंदणीकृत झालेल्या दवाखान्यासाठी निविदा बोलावून वाटप करावे. |
| ४. | येवला | प्राथमिक शाळा व मैदान | १९४५.०० | सदर भूखंडासाठी शासन मान्य खाजगी शिक्षण संस्थेकडून निविदा बोलवावी. |
| ५. | हजार खोली मालेगांव | पोलीस स्टेशन - हॉल | २२५०.००<br>५००.०० | सदर भूखंडावर दुकाने बांधून एक खोली पोलीस खात्यासाठी ठेवावी. |

"मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार त्वरीत कार्यवाही करुन मंडळाच्या अभिन्यासात वरील बदल करुन प्राधिकरणाची मान्यता घेऊन व सुधारीत अभिन्यासास स्थानिक नियोजन संस्थेकडून मान्यता घेऊन नंतरच निविदा बोलविण्यात याव्यात.

. . . . .

विषय क्र. ३: हर्सूल औरंगाबाद येथे महानगरपालिका सफाई कामगारांकरिता बांधलेल्या गाळयांच्या वाढीव किंमतीस मंजूरी देणेबाबत.

ठराव क्र. ४०९

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने खालील प्रमाणे निर्णय घेतले.

१] सफाई कामगारांना वाढीव किंमत भरण्यास सांगावी, जर सफाई कामगार वाढीव किंमत भरण्यास तयार नसतील तर वाढीव किंमतीच तीन समान हप्ते करुन पैसे भरण्याची सवलत द्यावी व त्याप्रमाणे त्यांचेकडून हमीपत्र घेऊन गाळे वाटप करण्यासंबंधी त्वरीत कार्यवाही करावी.

२] मंडळाने वाढीव किंमतीस मान्यता दिली.

३] हे सर्व सफाई कामगार औरंगाबाद महानगरपालिकेचे कर्मचारी असल्यामुळे या कामगारांकडून रक्कम वसुल करण्याची जबाबदारी औरंगाबाद महानगरपालिकेने स्विकारावी व रक्कम वसुल करुन औरंगाबाद गृहनिर्माण मंडळास अदा करावी असा निर्णय घेण्यांत आला.

विषय क्र. ४:- औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाच्या आर-२८-एन-७ सिडको, औरंगाबाद मधील २ भूखंड सहकारी संस्थांना वाटप करणेबाबत.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, मंडळाने आर-२८ एन-७ सिडको औरंगाबाद येथील दोन भूखंड सहकारी संस्थांना वाटप करण्यासाठी निविदा मागविल्या होत्या, सदरभूखंडासाठी रु. ५५१ व ५४३ असा प्रती चौ.मी दर प्राप्त झाला आहे. वास्तविक मंडळाने लगतच्या वसाहतीमध्ये एन-७ निवासी भूखंडाचे जे वाटप केले त्याचा सध्या साधारण दर रु. १५०/- प्रती चौ.मी काढलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये व प्राधिकरणाचे धोरण ना नफा ना तोटा असे असल्यामुळे सदर भूखंड निविदा मागवून वाढत्या दराने सहकारी संस्थांना वाटप केल्यास सिडको आपणाला मुकुंदवाडी व मुर्तिझापूर येथील जमिनीचा वाढीव दर देण्यास भाग पाडील. वरील जमिनीबाबतचा किंमतीचा वाद चालु आहे. तेंव्हा केवळ दोन भूखंड ५... मंडळाच्या कार्यपध्दतीबद्दल विपरीत प्रचार होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे उपसभापतींनी सांगितले.

या वर मंडळाचे सदस्य श्री. व्यंकटराव देशपांडे यांनी सुचविले की, उपरोक्त भूखंडावर दुकाने बांधण्यांत यावी.

यास इतर सदस्यांनी सम्मती दर्शविली.

ठराव क्र. ४१०

या विषयावर चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की, आर-२८ एन-७ सिडको येथील भूखंडावर दुकानांची योजना राबवावी तसेच प्राप्त झालेल्या निविदा रद्द करून अनामत रक्कम परत करावी.

विषय क्र. ५: विशेष नियोजन प्राधिकरण वाळूज आणि विशेष नियोजन प्राधिकरण-नांदेड सद्य: स्थितीबाबत.

ठराव क्र. ४११

शासनाने, वाळूज विशेष नियोजन प्राधिकरण अधिसुचीत क्षेत्राच्या विकासाचे काम सिडकोकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेतला याची मंडळाने नोंद घेतली. आणि नांदेड विशेष नियोजन प्राधिकरण हे "म्हाडाकडून" काढून घेऊन सिडकोकडे सोपवावे अथवा "म्हाडास" विशेष नियोजन प्राधिकरण नांदेड म्हणून केलेली नेमणूक ही रद्द करण्यात यावी असे प्राधिकरणामार्फत शासनास कळवावे असा निर्णय मंडळाने सर्वानुमते घेतला.

विषय क्र. ६: नंदुरबार नगरपालिका यांचेकडून आलेल्या झोपडपट्टी सुधारणा कामांच्या प्रस्तावास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

ठराव क्र. ४१२

मंडळाने बाब टिप्पणीमध्ये नमुद केलेल्या सर्व बाबींचा विचार करून सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव पाठवितांना नगरपालिकेने आवश्यकतेपेक्षा कमी सुविधांचा प्रस्ताव सादर केला आहे. आणि प्रस्तावीत केलेल्या सुविधा पुरेशा आहेत किंवा कसे याबाबत खुलासा झालेला नाही. त्यामुळे नगरपरिषदेने प्रस्तावित सुविधा पुरेशा असल्याबद्दलच व वसाहतीस देण्यात येणा-या सुधारणा शासनाचे आदेशातील मानकांनुसार आवश्यक आहेत असे प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा निर्णय घेतला व मंजूरी प्रदान केली.

. . .

विषय क्र.७:- मा.सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

[१] शहानुरवाडी औरंगाबाद स.क्र.४५ वरील गृहनिर्माण योजनेत बांधकाम परवाना मिळणेबाबत.

ठराव क्र.४१३

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, मंडळाने अभिन्यासातील बांधकाम परवानगीकरिता जुलै ८९ मध्ये म्हणजेच बांधकाम सुरु करावयाच्या दिडवर्षे अगोदर महानगरपालिकेकडे परवानगी मागितली होती. तसेच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी वेळोवेळी सांगितलेल्या बाबी पूर्ण केलेल्या आहेत असे कागदपत्रावरुन दिसते. महानगरपालिकेने एकाच वेळी सर्व बाबींची पुर्तता करुन घेण्याकरिता मंडळास कळविण्याची दक्षता घेतली असती तर बांधकाम परवानगी वेळीच मिळाली असती. मंडळाने अल्प उत्पन्न गटातील गाळे वरील जमिनीवर घेतले असून ते शासनाच्या २० कलमी कार्यक्रमाच्या उद्दिष्टामध्ये समाविष्ट असल्यामुळे मंडळाला काम सुरु करणे भाग पडले. महानगरपालिकेचे नियम अव्हेरण्याचा मंडळाचा हेतू नव्हता. अशा परिस्थितीत औरंगाबाद महानगरपालिकेने बांधकाम सुरु केल्याबद्दल लावलेला दंड रु.२३४२८/- संयुक्तीक वाटत नाही म्हणून माफ करण्यांत यावा व बांधकामाचे नकाशे मंजूर करावेत असा ठराव मंडळ करीत आहे.

मंडळाच्या भावना मा. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांना सविस्तर माहितीनिशी कळवाव्यात.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभेनंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपली.

. . . .